जा.क्र.मरापप/शिष्यवृत्ती/२०१७/२८४९
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे १.
दिनांक - १७/०५/२०१७

**प्रति,**

मा. महासंचालक
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
तळमजला, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

**विषय :- पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ५ वी) व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ८ वी) दि. २६ फेब्रु. २०१७ च्या अंतरिम (तात्पुरता) निकालाच्या प्रसिद्धी निवेदनाबाबत...**

**महोदय,**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत दिनांक २६ फेब्रुवारी, २०१७ रोजी घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ५ वी), शासकीय विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा, आदिवासी विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा, विमुक्त जाती व भटक्या जमाती विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा आणि पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ८ वी) चा अंतरिम (तात्पुरता) निकाल बुधवार, दि. १७ मे २०१७ रोजी सकाळी ११.३० वाजता www.mscepune.in व www.puppss.in या परिषदेच्या संकेतस्थळावर पाहता येईल. त्याबाबतचे प्रसिद्धीपत्रक सोबत जोडले आहे. कृपया सदरहू निवेदनास राज्यातील प्रमुख वर्तमानपत्रातून, आकाशवाणी व दूरदर्शन केंद्रावरुन विनामूल्य प्रसिद्धी द्यावी अशी आपणास विनंती आहे.

**सोबत -** प्रसिद्धीपत्रक

**आपला विश्वासू,**

(सुखदेव डेरे)
**आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे - ०१.**

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी -**
**जिल्हा माहिती अधिकारी, पुणे.**

F:\MOKASHI\SCHOLARSHIP PRADAN KARNYACHE NIKASH\scholarship exam 2017 PRASIDHHIPATRAK.docx

# प्रसिद्धीपत्रक

**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे**

**पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ५ वी) व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ८ वी) दि. २६ फेब्रु. २०१७**

**अंतरिम निकाल**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत दिनांक २६ फेब्रुवारी, २०१७ रोजी घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ५ वी), शासकीय विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा, आदिवासी विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा, विमुक्त जाती व भटक्या जमाती विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा आणि पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ८ वी) चा अंतरिम (तात्पुरता) निकाल बुधवार, दि. १७ मे २०१७ रोजी सकाळी ११.३० वाजता www.mscepune.in व www.puppss.in या परिषदेच्या संकेतस्थळावर घोषित करण्यात येत आहे.

विद्यार्थ्यांना गुणपडताळणी करुन घ्यावयाची असल्यास तसेच उत्तरपत्रिकांची डिजीटल स्कॅन प्रत हवी असल्यास त्यासाठी संबंधित शाळांच्या लॉगीनमध्ये दि. १७ मे २०१७ ते ३१ मे २०१७ या कालावधीत ऑनलाईन अर्ज उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

गुणांच्या पडताळणीसाठी प्रत्येक पेपरकरीता रु. ५०/- व उत्तरपत्रिकांच्या डिजीटल स्कॅन प्रत मिळणेसाठी प्रत्येक पेपरकरीता रु. १००/- याप्रमाणे शुल्काची रक्कम ऑनलाईन पेमेंटद्वारे भरणे आवश्यक आहे.

विद्यार्थ्यांच्या नावात, आडनावात, वडीलांचे नावात, आईचे नावात, शहरी/ग्रामीण, अभ्यासक्रम, जाती संवर्गात, इ. दुरुस्ती करावयाची असल्यास संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांमार्फत आवश्यक पुराव्यासह प्रस्ताव परीक्षा परिषदेकडे mscescholarship@gmail.com या ईमेल आयडीवर किंवा पोस्टाद्वारे दि. ३१ मे २०१७ पर्यंत परिषदेस पाठवावेत. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

विहित मुदतीत आवश्यक शुल्कासह ऑनलाईन प्राप्त झालेल्या अर्जानुसार संबंधित शाळेच्या ईमेल आयडीवर गुणपडताळणी व उत्तरपत्रिका डिजीटल स्कॅन प्रतीचा निर्णय अर्ज प्राप्त झाल्यानंतर ३० दिवसांपर्यंत कळविण्यात येईल. विहित मुदतीत ऑनलाईन आलेले गुणपडताळणी व उत्तरपत्रिका डिजीटल स्कॅन प्रत मागणी अर्ज निकाली काढल्यानंतर अंतिम निकाल व गुणवत्ता यादी प्रसिद्ध केली जाईल.

(सुखदेव डेरे)
**आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे - ०१.**

**ठिकाण - पुणे**
**दिनांक - १७ /०५/२०१७**

F:\MOKASHI\SCHOLARSHIP PRADAN KARNYACHE NIKASH\scholarship exam 2017 PRASIDHHIPATRAK.docx